दैनिक
# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २७१ वा गुरूवार दि.०४ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# भाजपाच्या दबावामुळे हेमंत पाटील, भावना गवळी यांचा पत्ता कट

## हेमंत गोडसे आणि धैर्यशील मानेंचे भवितव्यही टांगणीला

मुंबई : प्रतिनिधी भाजपाच्या दबावापुढे अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना झुकावे लागले आहे. हिंगोलीचे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांची आधी जाहीर केलेली उमेदवारी रद्द करून त्यांच्या जागी बाबुराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यवतमाळ – वाशिमच्या विद्यमान खासदार भावना गवळी यांनाही उमेदवारी नाकारण्यात आली असून, त्यांच्या जागी हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना यवतमाळ वाशिममधून उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिकच्या जागेसाठी भाजप आग्रही असल्याने तेथील शिंदेंच्या शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांचीही उमेदवारी जाणार अशी चिन्हे आहेत तर हातकणंगलेमधील शिंदेचे खासदार धैर्यशील माने यांनाही बदलले जाणार अशी चर्चा आहे.गेल्या काही दिवसांपासून महायुतीतील जागावाटपाचा गोंधळ सुरू होता. दुस–या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपत आली तरी कोंडी फुटत नव्हती. उद्धव ठाकरे यांना सोडून आपल्या सोबत आलेल्या सर्व खासदारांना उमेदवारी मिळालीच पाहिजे अशी ठाम भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली होती. परंतु भाजपाने काही जागांसाठी व काही उमेदवार बदलण्यासाठी आग्रह धरला होता. अखेर या दबावापुढे शिंदे यांना नमावे लागले आहे. शिंदे गटाने पहिल्या यादीत हिंगोलीतून हेमंत पाटील यांची उमेदवारी जाहीर केली होती. पण आज अखेरच्या क्षणी त्यांच्याऐवजी बाबुराव कदम कोहळीकर यांचे नाव जाहीर करण्यात आले. हेमंत पाटील यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना यवतमाळ वाशिममधून उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे तेथील खासदार भावना



गवळी यांचे तिकीट कापले जाणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. नाशिकच्या हेमंत गोडसे आणि हातकणंगलेचे खासदार धैर्यशील माने यांचेही पत्ते कापले जाणार अशी चर्चा असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपाने मोठा धक्का दिला आहे. भाजपच्या दबावामुळे आपल्या सोबत आलेल्या खासदारांना डावलल्यामुळे शिंदे गटात प्रचंड नाराजी असून, पुढच्या काळात महायुतीत महाभारत होण्याची शक्यता आहे.शिंदेंच्या सहा खासदार निवडणुकीपूर्वीच बाद? शिवसेनेत फूट पडल्यानंतर १८ पैकी १३ खासदारांनी एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला होता. यापैकी रामटेकच्या कृपाल तुमाने यांचे तिकीट आधीच कापण्यात आले होते. गजानन किर्तीकर यांच्या मुलाला ठाकरे गटाने वायव्य मुंबईतून उमेदवारी दिल्याने ते निवडणुकीतून बाहेर पडले होते. भाजपच्या दबावामुळे हेमंत पाटील व भावना गवळी यांची उमेदवारी गेली आहे. नाशिक मतदारसंघासाठी भाजप व राष्ट्रवादी कॉँग्रेस आग्रही असून, ही जागा छगन भुजबळ यांच्यासाठी राष्ट्रवादीला दिली जाईल अशी जोरदार चर्चा आहे. तसे झाल्यास हेमंत गोडसे यांचा पत्ता कट होईल. हातकणंगले येथून धैर्यशील माने पुन्हा निवडून येऊ शकणार नाहीत, त्यामुळे उमेदवार बदलावा यासाठी भाजप आग्रही आहे. त्याऐवजी त्यांच्या आई, माजी खासदार निवेदिता माने यांचे नाव पुढे आले आहे.भावना गवळी बंडखोरी करणार ? यवतमाळ वाशिम मधून पाच वेळा खासदार म्हणून निवडून आलेल्या भावना गवळी उमेदवारी नाकारल्याने संतप्त झाल्या असून, त्यांनी बंडाचे संकेत दिले आहेत. आपली उमेदवारी कापली जाण्याची कुणकुण लागल्याने मागच्या काही दिवसांपासून त्या मुंबईत तळ ठोकून बसल्या होत्या. पण त्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाही. आपल्याऐवजी राजश्री पाटील यांना उमेदवारी देण्यात आल्याचे वृत्त कळताच त्यांनी आपण माघार घेणार नाही,उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे सांगितले.

# ‘उखाड के फेक देंगे’

अमरावती : अमरावती लोकसभा मतदारसंघातून आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांनी उमेदवारी अर्ज आज दाखल केला. यावेळी प्रहार पक्षाकडून भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी बच्चू कडू यांनी आपल्या भाषणात आमदार रवी राणा आणि खासदार नवनीत राणा यांच्यावर घणाघात केला. ‘हम डरते नहीं. डराने वालों को हम डराते है. तानाशाही नहीं चलेगी. उखाड के फेक देंगे’असा हल्लाबोल बच्चू कडू यांनी केला.दरम्यान, कडू म्हणाले, जेव्हा निकाल हाती येईल तेव्हा देशातील नेते पहात राहतील. तुम्ही हळदी–कुंकू घेता. इकडे फिनल मिलचा कामगार आत्महत्या करत आहे. आमचा प्रहार पक्ष स्वतंत्र आहे. आम्ही सर्वसामान्य माणसाचे गुलाम आहोत. काल एक चिठ्ठी आली– जास्त बोलाल तर जेलमध्ये जाल. बच्चू कडू कार्यकर्त्यांची अवलाद आहे. दुपट्टा घातला आणि नेता झाला अशी परिस्थिती नाही. जेलमध्ये टाकलं तरी जेलमधून आवाज काढणार. रामदेव बाबाने उद्योग सुरू केले. बचत गटाचे काय? मोदी म्हणायचे अच्छे दिन आएंगे. हे आहेत का अच्छे दिन?



१७ रुपयांच्या फाटक्या साड्या वाटल्या. हेच का अच्छे दिन?'', असा प्रश्न बच्चू कडू यांनी उपस्थित केला.निवडणुकीमध्ये मेळघाटमध्ये साड्या वाटता. तिथे पाण्याची गरज आहे. रोजगाराची गरज आहे. गोडाऊनमध्ये पडलेल्या साड्या वाटल्या आहेत. या जिल्ह्याची जर कोणी प्रतिमा खराब करत असेल तर आईची शपथ आम्ही सोडणार नाही. जातप्रमाणपत्रात सांगितले आहे की, हा गुन्हा आहे. पण अजून निकाल नाही. म्हणून राणा आता जनतेच्या न्यायालयात आहे असे बच्चू कडू म्हणाले.

# टीबी गोळ्यांचा तुटवडा मग २०२५ पर्यंत भारत टीबी मुक्त कसा होणार – रुग्णासह नातेवाईकांचा सवाल

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे लक्ष देतील का?

लातूर :– विलासराव देशमुख शासकीय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वो पचार रुग्णालयात, खाजगी रुग्णालयात टीबी क्षयरोगावर जालीम औषधे असलेले टीबी मुक्त गोळ्यांचा तुटवडा आहे या गोळ्या बाजारातही मिळत नाहीत परंतु केंद्र व राज्य सरकार हे २०२५ सालापर्यंत टीबी मुक्त भारत करण्याचा वलगणा करतात परंतु २०२४ सालातच टीबी गोळ्यांचा तुटवडा असेल तर एकाच शिलकी वर्षात गोळ्याचे उत्पादन वितरण कसे करणार आणि रुग्ण टीबी मुक्त कसा होणार असा सवाल रुग्णासह त्यांचे नातेवाईक करीत असताना दिसत आहे. केंद्र व राज्य सरकार सर्वच आघाड्यावर यशस्वी वाटचाल करीत असताना टीबी क्षयरोगावर उपचार करणारी इंजेक्शन गोळ्याच उपलब्ध नसेल तर केंद्र व राज्य सरकारचे २०२५ सालापर्यंत टीबी मुक्त नागरिक भारत ही घोषणाच फसवी ठरते अशीच प्रतिक्रिया रुग्णासह नागरिकांतून व्यक्त होताना दिसते आहे. राज्य शासनाच्या मागणीनुसार क्षमतेप्रमाणे केंद्र सरकार हे औषध निर्माण संस्थेकडे संबंधित औषधी गोळ्या निर्माण करण्यासाठी नियमित मागणी करीत असते त्या औषधी गोळ्यांच्या उत्पादनासाठी कालावधी लागतो उत्पादनानंतर त्या सरकारकडे जमा करणे सरकारने त्या वितरित करण्यातच वेळ जातो तोपर्यंत टीबी रुग्ण दगावण्याची ही भीती असते त्यामुळे टीबी रुग्णाची गरज लक्षात घेऊन केंद्र व राज्य सरकारने तातडीने




कारवाई करून औषधी कंपन्याकडून टीबी मुक्त गोळ्या शासकीय, खाजगी रुग्णालयात, औषधी विक्रेत्याकडे उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी रुग्णसह नातेवाईक मार्फत होताना दिसते आहे. तरी या टीबी गोळ्याच्या तुटवडा कडे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी लक्ष घातले तर लवकरात लवकर गोळ्या मिळतील ही रुग्णांची अपेक्षा आहे.

# श्री. सुधाकर शृंगारे यांचा लातूर लोकसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टी व महायुतीचे महाविजय २०२४ अभियान मधून सक्रीय सहभाग.

लातूर– भारतीय जनता पार्टी व महायुतीचे महाविजय २०२४ अभियान मधून उदगीर विधानसभा मतदारसंघात श्री सद्गुरू उदगीर बाबा महाराज यांच्या समाधीचे दर्शन, हजरत खाजा बाशा दर्गाह येथे चादर अर्पण, श्री उद्धव महाराज हैबतपूरकर चौबारा, सद्गुरु हावगी स्वामी महाराज मठ, माजी आमदार श्री. सुधाकरजी भालेराव, भाजप युवा मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री अमोलजी निडवदे, माजी नगरसेवक (राष्ट्रवादी कॉँग्रेस अजितदादा गट) श्री. अनिलजी मुदाळे, श्री. अशोकजी फुलारी, प्रसिद्ध सराफा व्यापारी श्री. देविदास औटे, मान्यवर प्राध्यापक श्री. मल्लेश झुंगास्वामी, माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी आदरणीय श्री. बसवराजजी बागबंदे, माजी नगराध्यक्ष श्री. राजेश्वरजी निटूरे, कापड व्यापारी श्री. गोपाळजी मुक्कावार, मान्यवर श्री. चंद्रकांत अण्णा वैजापुरे, संघ परिवारातील मान्यवर श्री. अजयजी दंडवते, डॉक्टर बाळासाहेब पाटील, प्रख्यात डॉक्टर माधव चंबुल, नामवंत उद्योजक श्री. सूर्यकांतजी मुक्कावार, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मान्यवर श्री. देविदास कांबळे, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटोदे, शिवसेना ज्येष्ठ नेते श्री. गुलाबजी पटवारी, माजी सभापती श्री. विजयकुमार पाटील, भाजपा ज्येष्ठ पदाधिकारी श्री. वसंतजी शीरसे, ज्येष्ठ पत्रकार श्री. युवराजजी धोत्रे, तसेच ींळपर्ीश्रव या नामांकित पर्यटन संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी कार्यालय,कापड व्यापारी असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशन उदगीर शाखा, नवयुवक व्यापारी गणेश मंडळ, श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ, गोरक्षण संस्था आणि भावसार समाजाचे पदाधिकारी व प्रतिनिधी यांचेशी राज्याचे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे मंत्री श्री. संजयजी बनसोडे यांच्यासह विविध कार्यक्रमातून लोकसंवाद केला. या वेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष श्री. बसवराजजी कौळखेडकर, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष श्री. पंडित सूर्यवंशी, माजी आमदार श्री. गोविंदअण्णा केंद्रे, माजी आमदार श्री. सुधाकर भालेराव, लोकसभा निवडणूक प्रमुख श्री. राहुल केंद्रे, भाजप जिल्हा सरचिटणीस श्री. भारत चामे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. रामभाऊ तिरुके, भाजप उदगीर शहराध्यक्ष श्री. मनोज पुदाले, माजी जि. प. सभापती श्री. बापूराव राठोड, श्री. सिद्धेश्वर पवार, उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती देवणी श्री. दिलीप मजगे, जिल्हा उपाध्यक्ष श्री. भागवत गुरमे, उदगीर तालुका भाजपा अध्यक्ष श्री. शिवशंकर धुप्पे, भाजपा ग्रामीण महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष उत्तराताई कलबुर्गे, भाजपा ग्रामीण युवा मोर्चा अध्यक्ष श्री. अमोल निडवदे, उपाध्यक्ष नगर परिषद उदगीर श्री. सुधीर भोसले, श्री. बालाजी गवारे, श्री. बसवराज रोडगे, नगरसेवक श्री. रामेश्वर पवार, श्री. साधू लोणीकर, श्री. गणेश गायकवाड, श्री. सुनील गुडमेवार, कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर संचालक श्री. श्याम डावळे, कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर संचालक श्री. वसंत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर संचालक श्री. सुभाष धनुरे, श्री. प्रदीप जोंधळे, श्री. अमोल अंकल्ले, श्री. अतिक शेख, श्री. नरेश सोनवणे, ॲड. श्री. दत्ता पाटील, श्री. प्रसाद नाईकवाडे, श्री. चैतन्य बोईनवाड, श्री. मयूर पटणे, श्री. शंकर रोडगे, श्री. सतीश कांबळे, श्री. रावसाहेब भालेराव, श्री. राजकुमार गडारे, श्री. कपिल मादळे, श्री. अजय बलांडे, श्री. अभिजीत आवटे, रासपा जिल्हाध्यक्ष श्री. नागनाथ बोडके, उदगीर विधानसभा रासप अध्यक्ष श्री. पप्पू सोमवंशी, नगरसेवक श्री. उपेंद्र चव्हाण, ॲड. माने, श्री. बळीराम केंद्रे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष मा. रामेश्वर चांडेश्वरे, विद्यार्थी आघाडी शहर उपाध्यक्ष प्रसाद पांढरे, विद्यार्थी आघाडी शहर अध्यक्ष मंगेश येरकुंडे, युवा मोर्चाचे उपाध्यक्ष विकास पांडे, रामेश्वर कोटलवार, राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित दादा गट) तालुका अध्यक्ष श्री. बालाजी भोसले, श्री. वसंत पाटील, राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित दादा गट) शहर अध्यक्ष श्री. सय्यद जानिमिया, नगरसेवक श्री. फैयाज भाई शेख, श्री. शशिकांत बनसोडे, श्री. राहुल अंबसंगे, श्री. उदयसिंग ठाकूर, श्री. चेतन वैजापुरे, श्री. कैलास पाटील, श्री. राजकुमार बिरादार, श्री. दत्ता खंकरे आदी मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.






दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# त्रिकोणाच्या त्रांगड्याची त्रेधा!

डोळ्यांस पट्टी बांधून 'राज्य' घेण्यासही अनेक इच्छुक आणि ज्याच्यावर 'राज्य' आहे त्यास बिलगण्यासही अनेक इच्छुक; अशी स्थिती महाराष्ट्रात सध्या आहे. महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय घडामोडींची तुलना आंधळी कोशिंबीर या खेळाशी होऊ शकेल. अर्थात या खेळात एक निरागसता असते. ती सध्याच्या राजकीय हालचालींत अजिबात नाही. उलट निरागसतेच्या अगदी विरोधी भावना या राजकीय कोशिंबिरीत शिगोशीग भरलेली दिसते. आणखी एक फरक या आणि निरागस आंधळ्या कोशिंबिरीत आढळेल. या खेळात ज्याच्यावर 'राज्य' असते त्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यास इतरांना स्पर्शून 'बाद' करावे लागते. राजकीय आंधळ्या कोशिंबिरीतील चित्र याच्या बरोबर उलट. लहानग्यांच्या या खेळात 'राज्य' कसे आपल्यावर येणार नाही, यासाठी स्पर्धा असते. येथे सर्व प्रयत्न राज्य आपल्यालाच कसे मिळेल याचे. त्यासाठी अनेक स्पर्धक स्वतःच्याच डोळ्यांस पट्टी आणि गुडघ्यांस बाशिंग बांधून तयार. लहानग्यांच्या आंधळ्या कोशिंबिरीत ज्यावर 'राज्य' येते त्याच्यापासून स्वतःस दूर राखण्याचा प्रयत्न अन्य स्पर्धकांचा असतो. येथे ही बाबही अगदी उलट. ज्याच्यावर राज्य आहे त्याच्या हातास आपण कसे लवकरात लवकर लागू असाच स्पर्धक खेळाडूंचा प्रयत्न या राजकीय आंधळ्या कोशिंबिरीत दिसतो. यामुळे एक विचित्र कुंठितावस्था राज्याच्या राजकारणात आलेली दिसते. डोळ्यांस पट्टी बांधून 'राज्य' घेण्यासही अनेक इच्छुक आणि ज्याच्यावर 'राज्य' आहे त्यास बिलगण्यासही अनेक इच्छुक; अशी ही विचित्र परिस्थिती. तिची दखल घ्यावी लागते याचे कारण हे असले बाल-शिशू राजकारण महाराष्ट्र पहिल्यांदाच अनुभवत असावा म्हणून.यास जबाबदार एकमेव घटक. केंद्रीय यंत्रणांच्या सौजन्याने सत्ताधाऱ्यांच्या दबावास बळी पडून आपलेच घर स्वहस्ते भेदून घेणारे राजकीय नेते. याआधी महाराष्ट्राने कधी पक्षांतरे पाहिली नाहीत असे नाही. खुद्द बाळासाहेब ठाकरे हयात असतानाही शिवसेना फुटली आणि काँग्रेसच्या फुटींची तर मोजदाद नाही. तीच गत काँग्रेसच्या मुळांतून जन्मास आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीही. तथापि गेल्या दोन वर्षांत जे काही झाले ते अभूतपूर्व होते. स्वतः अन्य पक्षांत जाण्याऐवजी पक्ष संस्थापकांनाच घराबाहेर काढण्याचा प्रयत्न एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी अनुभवला. त्याच्या बऱ्यावाईटाची चर्चा करण्याचे कारण नाही. राजकारणात प्रत्येक शेरास सव्वाशेर भेटत असतो या 'न्यायाने' जे काही झाले ते झाले. तथापि जे काही झाले त्याचा परिणाम असा की भाजपेच्छुक आणि भाजप-मार्गे सत्ताइच्छुक नेत्यांची संख्या कमालीची वाढली. एखाद्या छिद्र पडलेल्या होडीतील प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी त्यातल्या त्यात बऱ्या नौकेचा आधार घ्यावा आणि अशा आधार शोधणाऱ्यांची संख्या हाताबाहेर गेल्याने ती बरी नौकाही बाग-बुग करू लागावी असे भाजपचे होत असावे. त्या पक्षाकडे हौशे, नवशे, गवशे गर्दी करत होतेच. पण आता ज्येष्ठांतही ती स्पर्धा सुरू झाली असून भाजपच्या नौकेचे रूपांतर मुंबईतील गर्दीकालीन लोकलच्या डब्यात होते की काय, असे वाटण्याजोगी परिस्थिती दिसते. भाजपचे 'श्री' हे निवडणुकांचे कार्य सिद्धीस नेण्यास निःसंशय समर्थ आहेत हे खरे. पण त्यामुळे परिस्थितीचा गुंता उलट आणखी वाढतो. कसे ते लक्षात घ्यायला हवे.उदाहरणार्थ ठाणे हा मतदारसंघ. हे उपनगर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यक्षेत्र. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात मुख्यमंत्र्यांच्या पक्षाचाच उमेदवार असावा ही अपेक्षा काही गैर नाही. खरे तर ही अगदी किमान अपेक्षा. पण मुख्यमंत्री असूनही शिंदे यांस ही साधी इच्छाही अद्याप तरी पूर्ण करता आलेली नाही. त्यांच्या पक्षाकडे उमेदवार नाही; सबब ही जागा आम्हास द्या असा भाजपचा युक्तिवाद. यातील पहिला भाग खराच. पण या निवडणुकांत पंतप्रधानांचा चेहरा हा एकमेव घटक निर्णायक ठरणार असेल तर शिंदे गटातील हा उभा राहिला काय किंवा तो राहिला काय? अखेर हा विजय भाजपचाच असणार. तेव्हा भाजपने इतके ताणायचे आणि स्वतःच आयात केलेल्या, स्वतःच प्राणप्रतिष्ठा केलेल्या 'आपल्याच' मुख्यमंत्र्यांवर ही वेळ का आणायची? वास्तविक प्रतिपक्षासही स्वमिठीत घेण्याच्या भाजपच्या अलीकडे वारंवार दिसू लागलेल्या दुर्मीळ गुणांमुळे राष्ट्रवादीचे एके काळी भ्रष्टाचारी म्हणून हिणवले गेलेले, यांना पाडा असे आवाहन ज्यांच्याबाबत देशाच्या सर्वोच्च नेत्याने केले होते असे, ज्यांच्यावर तब्बल ७० हजार कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप होता असे इत्यादी अनेकांस भाजपने उदार अंतःकरणाने प्रेमालिंगन दिले, त्यांना आपले म्हटले. असे असतानाही मग छगन भुजबळ यांच्यासारख्यांस नाशिक मतदारसंघातून उमेदवारी देण्यास भाजपने विरोध का बरे करावा? भले तो असेल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा मतदारसंघ! पण ज्या उदार अंतःकरणाने शिंदे आणि त्यांच्या साथीदारांस भाजपने आपले मानले, ज्या विशाल दृष्टिकोनातून अजित पवार आणि त्यांच्या सिंचन-सवंगड्यास भाजपने पापमुक्त केले, त्यांच्यासाठी भाजपने एवढेही करू नये, ही बाब दुःखदायक! यातून भाजप अन्य पक्षीयांस ते आत येईपर्यंत करकमलांनी कुरवाळतो आणि एकदा का ही मंडळी आत आली की त्यांस पदचरणांनी तुडवाळतो असे चित्र निर्माण होण्याचा धोका आहे. या 'चारसो-पार' जाणाऱ्या महायुतीची ही तऱ्हा. तिचेच प्रतिरूप तीस आव्हान देण्याच्या वल्गना करणाऱ्या महाविकास आघाडीतही दिसून येते. उद्धव ठाकरे यांची 'मशाल' कोणी हाती घ्यावी तर त्याच्या मुखी अचानक 'तुतारी' वाजू लागते आणि ती खाली ठेवावी तर समोर 'पंजा' उभा ठाकतो. त्यामुळे कोणी काय करावे आणि कोण काय करणार, याचा अंदाज अद्याप तरी या आघाडीच्या सूत्रसंचालकांस आहे, असे दिसत नाही. शिवसेना काय करते ते काँग्रेसला कळेल आणि राष्ट्रवादी काय करू इच्छितो त्याची पूर्वकल्पना अन्य दोघांस असतेच असे नाही.यास जबाबदार आहे ते भाजपचे घाऊकपणे पक्ष दुभाजनाचे राजकारण. इतका काळ भाजपस एकच पवार वा एकच ठाकरे यांस 'हाताळावे' लागत होते. आता पवारही दोन आणि ठाकरे दोन अधिक एक एकनाथ शिंदे. या घोळातल्या घोळात नक्की कुठे आहेत याबाबत चतुर संभ्रम निर्माण करणारे आणि तरीही हे कोणत्या मार्गाने कोठे जाणार आहेत याचा पुरता अंदाज सर्वांस आहे असे प्रकाश आंबेडकर, दिशा हरवून दशा झालेले रामदास आठवले आणि राज ठाकरे यांचे आपापले पक्ष, ओवैसी यांची राखीव फौज आणि वर पुन्हा या सर्व पक्षांतले नाराज! हे एकत्र केले तर महाराष्ट्राच्या राजकारणाचा जत्रेत भल्या मोठ्या पातेल्यात शिजवला जाणारा खिचडा कसा झालेला आहे हे लक्षात येईल. इतके दिवस महाराष्ट्राच्या राजकारणात उभय बाजूंनी 'हम दो आणि हमारे (फार फार तर) दो' इत्यादी युत्या, आघाड्या होत्या.

# बंडनाट्यानंतर काँग्रेस मुख्यमंत्र्यांची सत्त्वपरीक्षा, भाजपसाठी हिमाचल लोकसभा प्रतिष्ठेची..

दयानंद माने पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपच्या निवडणूक प्रचारयंत्रणेचे प्रमुख अमित शहा यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा मिळविण्याचा विडा उचलला आहे. त्यासाठी ते सर्व प्रकारच्या मार्गांचा अवलंब करत बारकाईने निवडणूक व्यवस्थापन राबवत आहेत, हे हिमाचल प्रदेशातील सध्याच्या राजकारणाकडे पाहिले असता लक्षात येईल.

देशाच्या राजकीय परिप्रेक्ष्याकडे पाहिल्यास भाजपला उत्तर भारतात अनुकूल, तर दक्षिण भारतात प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जावे लागेल, असे दिसते. अर्थात ते भाजपला नवीन नाही. मात्र उत्तर भारतात एकाही जागेची जोखीम घ्यायची नाही हे भाजप जाणून असल्याने हिमाचल प्रदेशसारख्या चार लोकसभा जागांच्या राज्यालासुद्धा महत्त्व आले आहे. म्हणूनच कंगना राणावतसारख्या तेवढ्याच लोकप्रिय व वादग्रस्त अभिनेत्रीला निवडणूक रिंगणात उतरविले आहे. निवडणुकीने फिरवले गणित

हिमाचल प्रदेश हे उत्तर भारतातील असे राज्य आहे की, जिथे सत्तेचा लंबक दर विधानसभा निवडणुकीत भाजप व काँग्रेस या राष्ट्रीय पक्षांमध्ये फिरतो. १९५२पासून या राज्यात चौदा विधानसभा निवडणुका झाल्या. सुरुवातीच्या तीन (१९५२ ते १९७२) आणि नंतरच्या १९८२ व १९८५ च्या दोन निवडणुका काँग्रेसने सलग जिंकल्या. १९९० ते २०२२ पर्यंतच्या आठ निवडणुकीत मात्र भाजप व काँग्रेस असा आळीपाळीने सत्ताबदल झाला. विधानसभेच्या चौदापैकी नऊ निवडणुकीत काँग्रेस तर पाचवेळा भाजपला सत्ता मिळाली. भाजपचे शांताकुमार व प्रेमकुमार धुमल तर काँग्रेसचे वीरभद्र सिंह हे राज्यातील महत्त्वाचे नेते. त्यांच्या नेतृत्वाखाली हे दोन्ही पक्ष निवडणूक लढवत. वीरभद्र सिंह चारवेळा, तर धुमल तीनवेळा मुख्यमंत्री राहिले. सध्या काँग्रेसचे सुखविंदरसिंह सुक्खू मुख्यमंत्री असून, त्यांना नाराजीचा सामना करावा लागतो आहे. त्याचे कारण गेल्या महिन्यात झालेल्या राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसचा झालेला पराभव. येथील राज्यसभेच्या जागेसाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांचा पराभव झाला. जो पक्षासाठी धक्कादायक ठरला. कारण राज्यात काँग्रेसचे सरकार, त्याचे ४० आमदार व तीन अपक्षांचे समर्थन प्राप्त असतानाही काँग्रेसची सहा व अपक्षांची नऊ मते फुटून भाजपचे उमेदवार हर्ष महाजन निवडून आले. सिंघवी आणि महाजन यांना समसमान (३४-३४) मते मिळाल्याने टॉसवर झालेल्या निवडीत सिंघवींचा पराभव झाला. भाजपने देशभरात प्रत्येक निवडणुकीत अवलंबलेल्या कूटनीतीचा हा परिणाम आहे. या फुटलेल्या आमदारांना भाजपचे समर्थन होते.तसेच विधानसभेत कटमोशन व अर्थसंकल्पावरील मतदानापासूनही हे आमदार दूर राहिल्याने या सहा बंडखोर आमदारांना विधानसभा अध्यक्षांनी पक्षांतर्गत विरोधी कायद्याचा आधार घेत अपात्र ठरवले. या सहा आमदारांची याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र निवडणूक आयोगाने या सहाही ठिकाणी पोटनिवडणूक जाहीर केली आहे. भाजपची जोरदार तयारी या घडामोडींनंतर आपल्या सरकारच्या आमदारांवर मुख्यमंत्री सुक्खू यांचा वचक नाही. परिणामी त्यांनी राजीनामा देऊन पायउतार व्हावे, म्हणून सुक्खूविरोधी गट सक्रिय आहे. पक्षश्रेष्ठींनी यावर समन्वय समिती नेमल्याने वादावर पडदा पडला आहे.लोकसभेच्या निवडणुकांचे कारण देत सुक्खू यांना तीन महिन्यांचा अवधी दिला आहे. त्यामुळे राज्यातील लोकसभेच्या चार आणि विधानसभांच्या सहा जागांची निवडणूक सुक्खू यांच्यासाठी सत्त्वपरीक्षाच आहे. निवडणुकीतील यशापयशावर त्यांच्या पदाचा फैसला होईल.या पार्श्वभूमीवर सुक्खू यांनी पक्षाची डागडुजी प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंह, मंत्री विक्रमसिंह व सहकाऱ्यांच्या मदतीने चालवली आहे. कालच त्यांनी तिरुपती बालाजीचे दर्शन घेऊन प्रचाराचे नियोजन केले आहे.दुसरीकडे भाजपने पक्षाध्यक्ष जे.पी. नड्डा यांचे गृहराज्य असलेल्या या राज्यातील चारही लोकसभा मतदारसंघात उमेदवार जाहीर करून आघाडी घेतली आहे. कांगडातून डॉ. राजीव भारद्वाज, मंडीतून अभिनेत्री कंगना राणावत, हमीरपूरमधून केंद्रीय मंत्री अनुरागसिंह ठाकूर तर सिमल्यातून सुरेशकुमार कश्यप हे उमेदवार आहेत.मागच्या तीन लोकसभा निवडणुकीत मंडी वगळता उर्वरित तिन्हीही मतदारसंघात भाजपने विजय मिळवला आहे. मंडी हा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वीरभद्र सिंह यांचा मतदारसंघ. २०२१च्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी व प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंह निवडून आल्या होत्या. ही जागा भाजपने प्रतिष्ठेची केल्याने कंगना राणावत यांना रिंगणात उतरवले आहे. त्यांनी प्रचारही धडाक्यात सुरू केला आहे. अनेक विषयांवर अत्यंत टोकाची मते व्यक्त केलेली ही अभिनेत्री आपल्या काही वादग्रस्त वक्तव्यांनी अडचणीत येते काय, असा तिच्या चाहत्यांना पडलेला प्रश्न होता. तो तिने निकाली काढला आहे. मात्र मैदान अजून बरेच दूर आहे. श्रीनेत यांची हुकली उमेदवारी हिमाचल प्रदेशात १ जून रोजी मतदान आहे. तोपर्यंत कंगना देशभरातील भाजपच्या प्रचारात सहभागी होऊ शकतात. कंगना यांच्या मंडीतील रोड शोवर टीका करताना काँग्रेसच्या प्रवक्त्या व सोशल मीडिया विभागाच्या



प्रमुख सुप्रिया श्रीनेत यांनी असभ्य भाषेत टीका केली होती. भाजपचा आयटी सेल त्यांच्यावर तुटून पडला. त्यानंतर श्रीनेत यांनी सारवासारव करत ते माझे अकाउंट नव्हते, असा दावा केला. काँग्रेसचे मंत्री विक्रमादित्य सिंह यांनीही श्रीनेत यांचा पोस्टचा निषेध करत डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न करत म्हटले की, कंगना आमची बहीण आहे. आम्ही तिचा योग्य तो सन्मान करू. तथापि, या वादाने उत्तर प्रदेशातील महाराजगंजमधून श्रीनेत यांना मिळणारी उमेदवारी रद्द झाली, असे बोलले जाते

# अर्थसंकल्प एक प्रकारचा कायदाच

– ड. भूषण राऊत आपले एक आर्थिक वर्ष कालच संपले, आर्थिक वर्षाच्या संदर्भात दरवर्षी एका दिवशी संसदेत काय होत आहे, याची सर्वच जण वाट बघत असतात. तो दिवस म्हणजेच संसदेत अर्थसंकल्प सादर होण्याचा दिवस. या अर्थसंकल्पात काय आहे, याची सर्वांनाच उत्सुकता असते. अर्थसंकल्पाची तरतूद भारतीय राजघटनेत आहे.भारतीय राज्यघटनेत अर्थसंकल्पाला 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' असा शब्द वापरला आहे. अर्थसंकल्प म्हणजे भारत सरकारकडे पैसे कोणकोणत्या माध्यमातून येतील आणि ते कुठे कुठे खर्च केले जातील, याचे विवरण असते. एक प्रकारे पुढील वर्षभर देशाचा खर्च चालवण्यासाठी संसदेची मान्यता घेण्याची ही प्रक्रियाच असते.अर्थसंकल्प म्हणजे देखील एकप्रकारे कायदाच असतो. दरवर्षी राष्ट्रपतींच्या अनुमतीने हा अर्थसंकल्प संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर केला जातो. आर्थिक बाबींसंदर्भात वित्त विधेयके आणि धन विधेयके हे विधेयकांचे दोन प्रकार आहेत.कोणताही नवीन कर लावण्याबाबतचे धन विधेयक अथवा वित्त विधेयक हे राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय सादर केले जाऊ शकत नाही. तसेच नवीन कर लावण्याबद्दलचे विधेयक हे राज्यसभेत सादर केले जाऊ शकत नाही, ते लोकसभेतच सादर करावे लागते. अर्थसंकल्पाच्या बाबतीत राज्यसभेला अत्यंत मर्यादित अधिकार असून राज्यसभेला अर्थसंकल्प फेटाळण्याचे अधिकार नसून केवळ सुधारणा सुचविण्याचे अधिकार आहेत. लोकसभा या सुधारणा स्वीकारू शकते अथवा नाकारून अर्थसंकल्प संमत करू शकते. अर्थसंकल्पातील भारताच्या एकत्रित निधीतून केल्या जाणाऱ्या खर्चावर म्हणजेच राष्ट्रपती, उच्च व सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधीश आदींचे पगार अथवा कोणत्याही कायद्यामध्ये सूचित केला गेलेला एकत्रित निधीतील खर्च याबाबत लोकसभेत मतदान होत नाही, त्यावर केवळ चर्चा होऊ शकते. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर संसदेच्या सभागृहात विभागनिहाय चर्चा होते, तसेच विविध विभागांच्या संसदीय समित्यांकडून अर्थसंकल्पाची चिकित्सा व अभ्यास केला जातो. त्यानंतर अर्थसंकल्पावर विभागनिहाय मतदान होते.अर्थात यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे हे मतदान केवळ लोकसभेत होते. त्यानंतर अर्थसंकल्पातील मंजूर बाबींचे विनियोजन विधेयकात रूपांतर होते. या विधेयकास राष्ट्रपतींनी संमती दिल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होते. एखाद्या विशिष्ट बाबतीत किंवा एकापेक्षा अनेक बाबतीत अर्थसंकल्पात केली गेलेली तरतूद अपुरी पडत आहे, असे लक्षात आल्यास वित्तीय वर्षात कधीही पुरवणी मागण्या सादर करून त्याबाबतची तरतूद केली जाऊ शकते.अर्थसंकल्पामध्ये विविध निधींची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये सरकारला मिळालेला सर्व महसूल व कर, कर्जे व कर्जांच्या परतफेडीदाखल मिळालेला पैसा, हे सर्व मिळून भारताचा एकत्रित निधी तयार होतो. या निधीतील एक रुपयादेखील सरकारला संसदेच्या संमतीशिवाय वापरता येत नाही. तसेच एकत्रित निधीत जमा झालेला पैसा सोडून बँकांतील रकमांवर मिळालेले व्याज इत्यादी निधी हा राज्य एकत्रित निधीत जमा होतो, हा पैसा खर्च करण्यासाठी संसदेच्या मंजुरीची गरज नसते. राज्यघटनेद्वारे आकस्मिकता निधी कायदा करण्याचे संसदेला सूचित करण्यात आले आहे. हा निधी सरकारला आपत्कालीन परिस्थितीत वापरता येतो.धन विधेयक आणि वित्त विधेयकात तांत्रिक स्वरूपाचा फरक आहे. एखादे विधेयक हे धन विधेयक आहे अथवा नाही यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा लोकसभेच्या अध्यक्षांना आहे. यापूर्वी असेही आढळून आले आहे की, राज्यसभेत एखादे विधेयक मंजूर होण्यास काही अडचणी दिसत असलेल्या सदर विधेयकाला धन विधेयक बनवून अशा विधेयकास राज्यसभेच्या मंजुरीची गरजच नसल्याची घटनात्मक परिस्थिती निर्माण केली जाते.धन विधेयक लोकसभेने संमत करून राज्यसभेकडे पाठवल्यानंतर ते चौदा दिवसांच्या आत मंजूर करून अथवा शिफारशींसह राज्यसभेला लोकसभेकडे पाठवावे लागते. अशा शिफारशी स्वीकारायच्या अथवा नाही याचा अंतिम अधिकार लोकसभेचा आहे.भारतीय राजघटनेच्या



कलम २६५ नुसार कायद्याने अधिकार दिल्याशिवाय कोणताही कर आकारला अथवा वसूल केला जाऊ शकत नाही, अशी स्पष्ट तरतूद आहे. अर्थसंकल्पी चर्चेमध्ये कपात सूचना नावाचे संसदीय आयुध असून, त्याद्वारे विरोधी पक्ष अर्थसंकल्पात कपात करण्याचे सुचवतो. अशी कपातसूचना मान्य झाल्यास तो सरकारचा मोठा नैतिक पराभव मानला जातो. एकंदरच देशाचा अर्थसंकल्प ही अत्यंत किचकट अशी प्रक्रिया आहे, मात्र ही किचकट प्रक्रिया पार पाडल्याशिवाय कोणत्याही सरकारला गत्यंतर नसते!

# दल बदलू नेते आणि कार्यकर्ते

दिवसेंदिवस भारतीय राजकारण गढुळ होत चालले आहे. एकमेकांवर रोजच आरोपांच्या फैरी झाडत पक्ष बदलून खोटी आश्वासने जनतेला राजकिय पुढाऱ्यांकडून दिली जात आहेत. ज्या विचारांना प्रमाण माणुन जनतेनी दिलेली मत स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी पुढारी लोक विकताना दिसत असल्याचे आरोपही होत असताना त्याचे समर्थक म्हणुन उदयास आलेले कार्यकर्ते मात्र बुचकळ्यात पडल्याचे दिसून येत आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांकडे विचारांची देवाण –घेवाण ही केवळ खुर्ची हस्तगत करण्यासाठी असल्याचे दिसून येत आहे. विरोधात असताना आपल्या नेत्यासाठी कार्यकर्त्यांनी विरोधातील नेत्यांना चांगलेच सुनावलेले असते. जर आपलाच नेता पुर्वीच झालं-गेलं विसरून मांडीला मांडी लावून बसत असेल तर कार्यकर्त्यांनी तुमच्यासाठी वेळोवेळी खंबीरपणे साथ देऊन विरोधकांना नामोहरण करण्याची एकही संधी सोडलेली नाही. तुम्ही मात्र तुरूंगात जाण्याच्या भीतीने पक्ष बदलत आहात हे कितपत योग्य आहे.

आज ग्रामिण भागात राजकीय पुढाऱ्यांची सतरंजी उचल भक्तांची काही कमी नाही. तुम्हीच सांगा नेत्यानो कार्यकर्त्यांना तुम्ही दिले काय ? तुमच्या मागे येणारा कार्यकर्ता आपल्या परिवाराची घडी नीट बसवण्याची सारखी धडपड करत असताना त्यांना तुम्ही, बाटली आणि मटणाच्या आहारी घालून अंधभक्त बनवले आहे. आपला नेता आपल्यासाठी आज ना उद्या काही तरी करेल यासाठी निवडणुकीच्या काळात तो आपल्या परिवाराची चिंता न करता राब-राब-राबतो. निवडून आल्यावर त्याला कचऱ्याप्रमाणे फेकुन दिल्या जाते.

नुकतीच लोकसभेची धामधुम सुरू झाली, त्या अनुषंगाने पुढाऱ्यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या प्रचाराला लागा अशा सुचना दिल्या गेल्याचे वृत्त ऐकायला मिळत आहे. त्यानुसार कार्यकर्तेही कामाला लागल्याचे दिसून येत आहे. येथे एक गोष्ट सांगावीशी वाटते कि, आजची तरूण मुलं सद्सदविवेक बूद्धीचा विचार न करता कोणाचाही प्रचार करत आहेत. आज आपल्या देशात काय चालू आहे, काय झाले पाहिजे याचाही विचार होणे गरजेचे आहे. सख्ख्या बापाचा शब्द न ऐकणारी मुलं नेत्याचा शब्द मात्र खाली पडू देत नाहीत. आमचाचं नेता निवडून येणार असे मॅसेज फेसबुक, व्हाट्सअप सारख्या इतर सोशल मिडीयावरून फिरताना दिसत आहेत. आपल्या भागात किती विकास कामे केली ? त्यापैकी किती पुर्ण झाली ? नागरीकांच्या हिताची कामे किती केली ? शेतकऱ्यांचे किती प्रश्न सोडवले ? असा सवाल नेत्याला विचारण्याऐवजी आजचा तरूण राजकिय नशेत होरपळत असल्याचे वास्तव चित्र समोर येत आहे.

राजकारणातील दलबदलू नेत्यांचा स्वभाव बघीतला तर देशहिताची कामे न करता, कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून स्वत:चं चांगभल करण्याचा मानस दिसून येत आहे. हे आजचं वास्तव नाकारता येत नाही. कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करायचे आणि शेवटी नेत्याने सांगितले म्हणुन गुपचुप शांत बसायचे असाच नियोजीत कार्यक्रम दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून एक निष्ठ राहुन पक्ष बांधनी केलेल्या कार्यकर्त्याच्या वाट्याला नेहमीच सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे. दल बदलू नेत्याला ज्या पक्षांनी अनेक पदे दिली, मंत्री होण्याचा मानही दिला तो त्या पक्षाचा होऊ शकला नाही, तो देशाचा आणि जनतेचा काय होईल हाही विचार कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. नुसतंच नंदी बैल गुबूगुबू करत बसू नये. याचे भान कार्यकर्त्यांनी ठेवले पाहिजे.

ज्या नेत्यासाठी आपण विरोधातील नेत्यांवर आरोप केले. तालुका गाव पातळीवर दुसऱ्यांचा रोष ओढवून घेतला तेच आता एकाच मंचावर खुर्चीला खुर्ची लावून बसत आहेत. पण कार्यकर्त्यांचे जीवन तसे नाही, ज्या व्यक्तींसाठी आपण आपल्याच गावातील बांधवांसोबत भांडत बसलो आणि आपले संबंध बिघडून टाकले ते आता कसे सुधारतील या विवंचनेत अनेक कार्यकर्ते अडकल्याचे बघायला मिळते. पन्नास-शंभर रूपयाचे पेट्रोल दुचाकी गाडीत टाकून नेत्यांची हुजरेगिरी करण्यापेक्षा, आपल्या आयुष्यातील बहुमुल्य वेळ वाया न घालवता आजच्या तरूण मुलांनी सद्सदविवेक बूद्धीचा विचार करूण आपले जीवनमान कसे सुधारता येईल याकडे लक्ष देतील का ? हा येणारा काळचं ठरवेल.

********

**दाऊ गाडगेवाड,**
**हिमायतनगर, जि. नांदेड**
**मो. नं. ९९२१५७२९३६**

# आराम म्हणजे फक्त झोप घेणे का? विश्रांतीचे नेमके किती आहेत प्रकार? डॉक्टरांकडून जाणून घ्या


घर सांभाळणे असो किंवा ऑफिसमध्ये काम करणं असो; प्रत्येक गोष्टीसाठी मेहनत ही लागतेच. घर सांभाळणारी प्रत्येक स्त्री सकाळी सगळ्यांच्या आधी उठते आणि सगळी कामे आवरून सगळ्यात शेवटी झोपते. दुसरीकडे ऑफिसला जाणारी मंडळी सकाळी लवकर घर सोडतात. ट्रेन, बसने प्रवास करून आठ-नऊ तास ड्युटी करतात आणि मग रात्री घरी येतात. हे सर्व करता करता, अनेकदा खूप थकवा, तणाव व चिडचिड होणे आदी आरोग्याच्या समस्या उदभवतात आणि या सगळ्यावर उपाय म्हणून आपण फक्त थोडा वेळ झोपणे म्हणजेच विश्रांती घेणे पसंत करतो. विश्रांती ही आपल्या संपूर्ण आरोग्यासाठी खूप जास्त गरजेची आहे. पण, विश्रांती म्हणजे केवळ रात्रीची झोप का? तर नाही आपले भावनिक, शारीरिक व आध्यात्मिक संतुलन राखण्यासाठी झोपेव्यतिरिक्त सात प्रकारची विश्रांती घेणेही आपल्या प्रत्येकासाठी तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणूनच आज आपण या लेखातून यासंबंधी अधिक जाणून घेणार आहोत. विश्रांतीचे प्रकार किती व कोणते आणि स्वतःच्या दैनंदिन दिनचर्येत याचा कसा उपयोग करून घ्यायचा हेसुद्धा आपण जाणून घेऊ.सेक्रेड रेस्ट : रिकव्हर युअर लाइफ, रिन्यू युअर एनर्जी, रिस्टोअर युअर सॅनिटी या पुस्तकाचे लेखक डॉक्टर सौंद्रा डाल्टन-स्मिथ यांच्या मते, विश्रांती हा केवळ एकच उपाय नाही. आपल्या शरीर आणि मनाला योग्यरीत्या कार्यरत ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या विश्रांतीची आवश्यकता असते. कारण- विश्रांतीचा प्रत्येक प्रकार तुमच्या शरीरातील ऊर्जा पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे विश्रांतीचे हे सात प्रकार समजून घेणे आपल्या सगळ्यांसाठीच फायदेशीर ठरणार आहे.विश्रांतीचे हे सात प्रकार म्हणजे शारीरिक, मानसिक, भावनिक, संवेदनात्मक , क्रिएटिव्ह, सामाजिक, व आध्यात्मिक. १. शारीरिक विश्रांती – शारीरिक विश्रांती म्हणजे आपण दिवसभर करीत असलेल्या हालचालींमधून थोडा वेळ आराम करणे होय. झोपेव्यतिरिक्त शारीरिक विश्रांती घेण्यासाठी तुम्ही पुढील काही गोष्टी करू शकता.जसे की, १. स्ट्रेचिंग, २. थोडा वेळ झोप घेणे, ३. मालिश करणे, ४. थोडा वेळ ब्रेक घेणे, ५. चालायला जाणे आदींचा यात समावेश असतो.जेव्हा आपण शारीरिकदृष्ट्या विश्रांती घेतो. तेव्हा आपण आपल्या स्नायूंना दुरुस्त करण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्प्राप्तीसाठी वेळ देतो. त्यामुळे आपल्याला थोडा कमी थकवा जाणवतो .२. मानसिक विश्रांती – मानसिक विश्रांती म्हणजे आपल्या मनात दररोज येणाऱ्या मानसिक तणावापासून विश्रांती घेणे होय. आपण अशा जगात राहतो जिथे नेहमी काही ना काही घडत असते. त्यामुळे काही काळासाठी मेंदूचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी त्याला ब्रेक देणे फायदेशीर ठरू शकते. मानसिक



विश्रांती घेण्यासाठी तुम्ही पुढील काही गोष्टी करू शकता.जसे की, १. तुमचा फोन बंद करून ठेवा. २. सोशल मीडियापासून स्वतःला लांब ठेवा. ३. ध्यान करा. ४. दररोज काही मिनिटे एका ठिकाणी शांत बसा आणि दीर्घ श्वास घ्या.जेव्हा आपण मानसिकरीत्या विश्रांती घेतो, तेव्हा आपण आपल्या मेंदूला रिचार्ज करण्यासाठी वेळ देतो. त्यामुळे आपल्याला लक्ष केंद्रित करणे, कार्यरत राहणे व सतर्क राहण्यास मदत होते.३. भावनिक विश्रांती – भावनिक विश्रांती म्हणजे दररोज सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या संकटांपासून विश्रांती घेणे. भावनिक विश्रांती घेण्यासाठी तुम्ही पुढील काही गोष्टी जसे की, १. एकट्याने वेळ घालवणे, २. तणावपूर्ण परिस्थिती टाळणे, ३. विश्वासू मित्र-मैत्रिणींशी संवाद साधणे, ४. स्वत:ची काळजी (सेल्फ केअर) घेणे, ५. जर्नलिंग करणे म्हणजेच रोज डायरी लिहिणे. ६. निसर्गाच्या सान्निध्यात राहणे इत्यादी गोष्टी करू शकता .या सर्व गोष्टी केल्यामुळे तुम्ही स्वतःसाठी वेळ काढू शकाल. भावनिक संतुलन राखू शकाल आणि यामुळे तुमची चिडचिडसुद्धा कमी होईल. भावनिक विश्रांती विशेषतः आव्हानात्मक ठरू शकते. कारण- स्वतःसाठी वेळ काढल्याबद्दल अनेकदा आपण स्वतःला दोषी ठरवतो. पण, ही बाब लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, स्वतःची काळजी घेण्यात, स्वतःसाठी वेळ काढण्यात कोणताही स्वार्थीपणा नाही.४. संवेदनात्मक विश्रांती – आपण दररोज आवाज, प्रकाश (लाईट) आणि इतर उपकरणांच्या दिवस-रात्र संपर्कात असतो. तर या उपकरणांपासून तुमच्या ज्ञानेंद्रियांना विश्रांती देणे म्हणजे संवेदनात्मक विश्रांती होय. तर संवेदनात्मक विश्रांती घेण्यासाठी तुम्ही पुढील गोष्टींचा तुमच्या जीवनात समावेश करू शकता. जसे की, १. टीव्ही बंद करून ठेवणे, २. डोळे बंद करून शांत बसणे, ३. एका शांत खोलीत वेळ घालवणे, ४. अंघोळ करणे, ५. एखादे (ङळश्रशपीं) शांत गाणे ऐकणे, ६. दीर्घ श्वास घेण्याचा सराव करणे आदींचा समावेश होतो. जेव्हा आपण आपल्या ज्ञानेंद्रियांना विश्रांती देतो, तेव्हा शरीरातील संवेदनांचे ओझे मनातून किंवा डोक्यातून काढून टाकण्यास आणि तणाव कमी करण्यास मदत होते.५. क्रिएटिव्ह विश्रांती – क्रिएटिव्ह विश्रांतीचा अर्थ असा आहे की, तुमच्या दैनंदिन कामातून म्हणजेच घर किंवा ऑफिसची कामे बाजूला ठेवून छंद जोपासणे. या विश्रांतीसाठी तुम्ही पुढील काही पर्यायांचा उपयोग करून पाहू शकता. ज्यामध्ये १. दररोजच्या कामातून विश्रांती घेणे, २. एखादा छंद जोपासणे, ३. तुम्हाला आवडणारी एखादी गोष्ट म्हणजेच चित्रकला, विणकाम, स्वयंपाक करणे; या क्रियाकलापांचा उपयोग करण्यास डॉक्टरांनी सांगितले आहे. जेव्हा आपण क्रिएटिव्ह विश्रांती घेतो, तेव्हा आपण नवीन गोष्टींचा विचार करण्यासाठी वेळ देतो; ज्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळण्यास मदत होते.६. सामाजिक किंवा सोशल विश्रांती – सामाजिक किंवा सोशल विश्रांती म्हणजे आपण दररोज ज्या गोष्टी करतो, त्यापेक्षा काहीतरी वेगळे करणे होय. दररोजच्या कामामुळे कुटुंब, मित्र-मैत्रिणींसाठी, तसेच स्वतःसाठी हवा तसा वेळ काढता येत नाही. म्हणून सोशल विश्रांती घेण्यासाठी तुम्ही पुढील पर्यायांचा वापर करू शकता. ज्यामध्ये १. एकट्याने वेळ घालवणे, २.जवळचे मित्र आणि कुटुंबासह वेळ घालवणे, ३. सोलो ट्रिप, ट्रेकिंग किंवा हॉटेलमध्ये जेवायला जाणे, ४. स्वत:ची काळजी घेणे या बाबींचा समावेश होतो. या विश्रांतीमुळे ताण, चिडचिड तर कमी होईलच आणि इतरांशी स्वतःला जोडून ठेवण्यासही मदत होईल.७. आध्यात्मिक विश्रांती :आध्यात्मिक विश्रांतीमध्ये तुम्ही ध्यान करणे, प्रार्थना करणे, तुम्हाला आवडणारे एखादे पुस्तक वाचणे, निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणे, योगा करणे अशा सर्व गोष्टींचा तुम्ही समावेश करू शकता. जेव्हा आपण आध्यात्मिकरीत्या विश्रांती घेतो, तेव्हा आपण स्वतःला आपल्या अंतरंगाशी जोडण्यासाठी आणि आपल्या जीवनाचा अर्थ शोधण्यासाठी वेळ देतो; जे आपल्याला जीवनाच्या प्रत्येक वाटेवर स्थिर राहण्यास मदत करतात.तुम्हाला तुमच्या दैनंदिन जीवनात या सात विश्रांतीच्या प्रकारांचा समावेश करणे कठीण वाटू शकते. पण, तुमच्या सर्वांगीण कल्याणासाठी ते अगदी आवश्यक आहे. या सात प्रकारच्या विश्रांतीचा तुमच्या जीवनात समावेश कसा करायचा याच्या काही टिप्स खालीलप्रमाणे :एक शेड्युल तयार करा – प्रत्येक प्रकारच्या विश्रांतीसाठी वेळ ठरवा आणि तुमच्या जीवनात त्यांना प्राधान्य द्या. जसे तुम्ही तुमची विविध कामे किंवा व्यायाम यासाठी वेळापत्रक तयार करता त्याचप्रमाणे अगदी विश्रांतीसाठीसुद्धा अधूनमधून आवश्यक तो वेळ द्या.विश्रांती घ्या – शरीर आणि मनाला विश्रांती देण्यासाठी दिवसभरात लहान-लहान ब्रेक घ्या. थोडे चालायला जा, ध्यान करा किंवा फक्त दीर्घ श्वास घ्या.सीमा निश्चित करा – तुमची वेळ आणि ऊर्जा या दोघांची एक सीमा निश्चित करा. एखादी गोष्ट तुम्हाला पटत नसेल, तर नाही म्हणायला शिका. तसेच जेव्हा तुम्हाला गरज असेल तेव्हा मदत मागायलाही घाबरू नका.स्वतःला डिस्कनेक्ट करा – तुमच्या मनाला विश्रांती देण्यासाठी तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांपासून नियमितपणे दूर रहा.प्रयोग करून पाहा – विविध प्रकारच्या विश्रांती घेण्याचे प्रयोग करून पाहा आणि आपल्यासाठी काय गरजेचे आहे ते जाणून घ्या. प्रत्येकाच्या गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे तुम्हाला कोणत्या विश्रांतीच्या प्रकारांमुळे शांतता मिळते ते शोधा आणि तुमच्या दिनचर्येत त्यांचा समावेश करून पाहा.सवय लावा – तुमच्या आयुष्यात विश्रांतीची सवय लावून घ्या. आपल्या दैनंदिन नित्यक्रमात त्याचा समावेश करा आणि या विश्रांती घेण्याच्या सवयीला स्वत:ची काळजी घेण्याच्या सरावाचा एक भाग बनवा.तुमच्या जीवनात या सात प्रकारच्या विश्रांतीचा समावेश करण्यास वेळ लागू शकतो; पण ते फायदेशीर आहे. विश्रांतीला प्राधान्य देऊन, तुम्ही अधिक संतुलित आणि परिपूर्ण जीवन जगू शकता. त्यामुळे विश्रांती घ्या, आराम करा आणि तुमच्या शरीर व मनाची योग्य ती काळजी घ्या. सर्व सात प्रकारच्या विश्रांतीचा स्वीकार करणे म्हणजे एक निरोगी, आनंदी आणि अधिक परिपूर्ण जीवन जगणे होय. म्हणून ब्रेक घ्या, विश्रांती घ्या तर आज आपण या लेखातून झोपेव्यतिरिक्त आरामाचे किती व कोणते प्रकार आहेत ते समजून घेतले.

# राज्यात ५ ते ८ एप्रिल दरम्यान पावसाचा अंदाज

नाशिक : निवडणुकीच्या रणधुमाळीत शुक्रवारपासून अवकाळी पावसाची शक्यता असून राज्यातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यात अवकाळी पाऊस पडणार असताना तापमानातही दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.राज्यात हवेची द्रोणीय परिस्थिती निर्माण झाली असल्याने आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. आर्द्रता वाढल्यामुळे पाऊस पडणार आहे. परिणामी शुक्रवार, दि. ५ एप्रिलपासून पुढील चार दिवस दि. ८ एप्रिलपर्यंत राज्यातील काही जिल्ह्यांत तुरळक तर काही भागात मुसळधार



पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. राज्यात वातावरण बदलले असताना तापमान वाढणार आहे. या काळात राज्यातील तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढणार आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण तामिळनाडू ते पूर्व विदर्भापर्यंत हवेच्या खालच्या स्तरात एक द्रोणिका रेषा तयार झाली आहे. ही रेषा कर्नाटक आणि मराठवाड्यावरून जात आहे. त्याचा परिणाम पावसावर होणार आहे. यामुळे ५ ते ८ एप्रिल दरम्यान पावसाचा अंदाज असून मागील आठवड्यात पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी अवकाळी पाऊस झाला होता. त्यामुळे शेती पिकांचे नुकसान झाले होते. शेतात काढून ठेवलेले रबी पीकही वाया गेले. आता पुन्हा पावसाचे संकट आल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरी ३८ ते ४० अंशाच्या दरम्यान राहील. मराठवाड्यात रात्रीच्या तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होऊन रात्रीही उकाडा जाणवू शकतो, असेही हवामान विभागाने म्हटले आहे.

# हेमंत गोडसे ठाकरे गटाच्या संपर्कात? बडगुजर यांच्या दाव्याचा गोडसेंकडून इन्कार

नाशिक : नाशिक लोकसभा मतदारसंघातून सलग दोन वेळा निवडून येऊनदेखील शिवसेना शिंदे गटाचे खासदार हेमंत गोडसे यांना उमेदवारीसाठी झगडावे लागत आहे. नाशिकमधून महायुतीकडून छगन भुजबळ यांचे नाव जवळपास निश्चित झाल्यामुळे गोडसे यांची अस्वस्थता वाढली असून, ते टोकाचा निर्णय घेऊ शकतात, अशी चर्चा सुरू झाली आहे. अशातच सिन्नरमधील मेळाव्यात ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी गोडसे संपर्कात असल्याचा दावा केल्याने राजकीय गोटात खळबळ उडाली आहे. दरम्यान, गोडसे यांनी बडगुजर यांचा दावा फेटाळून लावला असून, बडगुजर हेच स्वत: यापूर्वी शिंदे गटाच्या संपर्कात होते, असा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे.नाशिकच्या उमेदवारीवरून महायुतीत संघर्ष सुरू आहे. सलग दोन वेळा या मतदारसंघातून निवडून येऊनदेखील गोडसे यांची उमेदवारी जाहीर होऊ शकलेली नाही. तब्बल दोन वेळा मुख्यमंत्र्यांच्या भेटी घेऊनदेखील गोडसे यांना दिलासा मिळू शकलेला नाही. या मतदारसंघातून राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांची उमेदवारी निश्चित झाल्याचे बोलले जात आहे. भुजबळ यांच्या उमेदवारीला थेट दिल्लीतून बळ दिले गेल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे नाशिकची जागा हातून निसटण्याच्या भीतीने शिंदे गटात अस्वस्थता पसरली आहे. सर्वेक्षणाचे कारण देत भाजपकडून राज्यातील पाच ते सहा मतदारसंघांमध्ये शिंदे गटाची कोंडी केली जात आहे. नाशिकची जागाही भाजपेयींच्या विरोधामुळेच संघर्षाची बनल्याने शिंदे गटात नाराजी आहे. अशा परिस्थितीतही गोडसे यांचा उमेदवारीसाठी लढा सुरूच आहे. गोडसे यांनाच उमेदवारी मिळावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भाजपच्या केंद्रीय नेत्यांसमवेत चर्चा सुरू आहे. त्यामुळेच नाशिकच्या उमेदवारीचा निर्णय अद्याप जाहीर होऊ शकलेला नाही. आता शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी सिन्नरमधील ठाकरे गटाच्या संवाद मेळाव्यात खळबळजनक दावा केला आहे. 'हेमंत गोडसेंचे तीन माणसे माझ्याकडे येऊन गेली. आम्हाला पदरात घ्या म्हटले, पण मी त्यांना सांगितले गद्दारांना माफी नाही, आता वेळ निघून गेली तुम्ही तुमच्या पक्षात परत जा आणि समोरून लढा, असे वक्तव्य बडगुजर यांनी केले आहे. दरम्यान, बडगुजर यांचा दावा गोडसे यांनी फेटाळून लावला आहे.

# निवडणूक कालावधीत ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

मुंबई :- भारत निवडणूक आयोगामार्फत लोकसभा निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे. महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होणार असून याअनुषंगाने १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात १९ एप्रिल रोजी सकाळी सात वाजेपासून १ जून २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत एक्झिट पोल साठी प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत ओपिनियन पोल अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असे निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

# वर्षभरात मासिक सभा नाही विकास कामे अर्धवट सोडून निधी उचलल्याची तक्रार

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) माहूर तालुक्यातील आर्थिक दुर्गम भागात असलेल्या ग्रामपंचायत मौजे दत्तमांजरी येथील ग्रामसेवकांनी गेल्या वर्षभरात ग्रामसभेसह एकही मासिक सभा न घेता विकास कामांची विल्हेवाट लावून अर्धवट विकास कामे सोडून देयके उचलल्याची गंभीर तक्रार उपसरपंच आणि सर्व सदस्यांनी केल्याने मौजे दत्तमांजरी ग्रामपंचायत विविध कारणांनी वादाचे भवऱ्यात सापडत आहे दिनांक ३/२/ २०२४ रोजी येथील उप सरपंच सह सर्व सदस्यांनी गटविकास अधिकारी सुरेश कांबळे यांच्याकडे तक्रार करून येथील ग्रामसेवकांनी गेल्या वर्षभरात एकही ग्रामसभा किंवा मासिक सभा घेतली नसल्याने गावात सुरू असलेली विकास कामे किती रकमेची आहेत नाली व रस्त्याची लांबी रुंदी किती अंगणवाडीचे काम अर्धवट जल जीवन चे काम निकृष्ट दर्जाचे तसेच इतर विकास कामा बद्दल कुठलीच माहिती सदस्यांना मिळत नसल्याने गावकऱ्यांनी विचारल्यास त्यांना कुठलेच उत्तर देता येत नाही तसेच गेल्या वर्षभरात ग्रामसेवक गावात कधी आले आणि कधी गेले याचा कोणालाच पत्ता लागत नसल्याने गावाचा कारभार रामभरोसे दिसत आहे एरवी एखाद्या ग्रामसेवकावर ग्रामपंचायत सदस्य किंवा गावकऱ्यांनी वाद घातल्यास किंवा तक्रार केल्यास संपूर्ण ग्रामसेवक संघटना त्या ग्रामसेवकांच्या पाठीशी उभी राहते परंतु एखाद्या ग्रामसेवकाने चुकीची कामे केल्यास त्यास तंबी देऊन गावाच्या विकासाचा कणा असल्याने गावासह तालुक्याची प्रगती व्हावी म्हणून ग्रामसेवक संघटना त्या ग्रामसेवक दबाव टाकत नसल्याचे वास्तव असल्याने ग्रामसेवक मनमानी करताना दिसतात तसाच प्रकार मौजे दत्त मांजरी येथे होत असल्याने ग्रामसेवकावर तात्काळ कारवाई करून गावातील विकास कामे त्याचे अंदाजपत्रक आणि इतर माहिती तात्काळ ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर डकवून नवीन ग्रामसेवकाची येथे तात्काळ नियुक्ती करून सुदरील ग्रामसेवकावर कारवाई करावी अशी मागणी येथील उपसरपंच शेवंताबाई आडे सदस्य ताराबाई राऊत पूजा आरके आरती पवार शशांक मोरे यांचे सह मान्यवरांनी गटविकास अधिकारी सुरेश कांबळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

# सरंद येथील गुरववाडी येथे नवीन सभामंडपाचे उद्घाटन पूजा निकम यांच्या हस्ते संपन्न

संगमेश्वर : येथील सरंद गावातील गुरववाडी येथे नविन सभामंडप उभारण्यात आला असून त्याचे उद्घाटन पूजा शेखर निकम यांच्या हस्ते करण्यात आले.

सरंद गावातील गुरववाडी नेहमीच आपल्या चांगल्या कामांमुळे चर्चेत असते. इथे आजही एकत्र कुटुंब पद्धती दिसून येते. येथील रहिवासी गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. कोणताही सण असो, उपक्रम असो की कार्यक्रम असो सर्वजण एकत्र येऊन साजरा करतात. यावेळी कामानिमित्त मोठ्या शहरात गेलेले चाकरमानी सुद्धा न चुकता गावी येऊन आनंदात सहभागी होतात.

सदर वाडीत राहणाऱ्या रहिवाशांना कोणतेही कार्यक्रम घेण्यासाठी, सभा आयोजित करण्यासाठी तसेच मुलांना देखील अभ्यासासाठी एखाद्या सभागृहाची आवश्यकता होती. हिच गरज ओळखून सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन आ. शेखर निकम यांच्या सहकार्याने सभामंडप उभारला. शनिवार दि. ३० रोजी चिपळूण पंचायत समितीच्या मा. सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महिला प्रदेश उपाध्यक्षा पूजा शेखर निकम यांच्या हस्ते या सभामंडपाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी गुरववाडीतील समाज बांधवांची एकत्र कुटुंब पद्धती पाहून त्यादेखील भारावून गेल्या. आजच्या काळात एकत्र कुटुंब पद्धतीची खूप आवश्यकता आहे. शिवाय एकत्र कुटुंबात एकमत टिकवून ठेवणे हे देखील महत्त्वाचे आहे. गुरववाडीची ही परंपरा पुढील पिढीला एक आदर्श असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्याचे कामी स्त्री महत्त्वाची असते म्हणत त्यांनी येथील महिलांचे कौतुक देखील केले. सदर कार्यक्रमास आ. शेखर निकम यांनी देखील भेट देऊन ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या व सर्वांनी मिळून केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी गुरववाडी ग्रामस्थांतर्फे त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सदर सभामंडपाच्या उद्घाटन प्रसंगी पूजा शेखर निकम यांच्या सोबत रत्नागिरी जिल्हा युवक कार्याध्यक्ष सुशिल भायजे,




माजी पं.स. सदस्य नाना कांगणे, राष्ट्रवादी काँग्रेस कोकरे जिल्हा गट अध्यक्ष संजय कदम, माखजन गावचे सरपंच मयुर बाष्टे, आंबव गावचे सरपंच शेखर उकार्डे, कळंबुशी गावचे युवा नेते अक्षय चव्हाण, सिध्देश गुरसळे, पांचाळ मॅडम तसेच गुरववाडी तरुण मंडळाचे विलास गुरव, विजय गुरव, रघुनाथ गुरव, दत्ताराम गुरव, प्रकाश गुरव, अमीत गुरव, राजेंद्र गुरव, कुणाल गुरव, संदेश गुरव, सुबोध गुरव, प्रथम गुरव, सतीश गुरव, सीताराम गुरव, दिपक गुरव, प्रमोद गुरव, व समस्त गावकरी मंडळी, महिला मंडळ आणि पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विद्यापीठ पदवी उन्हाळी परीक्षा २०२४ सुरळीत सुरू





लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (केंद्र क्रमांक ३०४), लातूर येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत पदवी उन्हाळी परीक्षा २०२४ दि. ०२ एप्रिल २०२४ पासून सुरळीतपणे सुरू झाली आहे. ही परीक्षा दि. ०२ एप्रिल २०२४ ते १५ मे २०२४ पर्यंत सुरू राहणार असून सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रामध्ये बी. ए., बी. कॉम., बीएस्सी., बी. सी. ए. आणि बी. सी. एस. या शाखेतील विद्यार्थी परीक्षा देत आहे. या परीक्षेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके यांचे मौलिक मार्गदर्शन मिळत असून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा सुरू आहे त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या परीक्षेमध्ये केंद्र प्रमुख म्हणून डॉ. राजकुमार लखादिवे कार्यरत असून सहाय्यक केंद्र प्रमुख म्हणून डॉ. विनायक वाघमारे कार्य करीत असून कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, राम पाटील, योगीराज माकने, योगेश मोदी, रंगनाथ लांडगे, संतोष येंचेवाड आणि भीमाशंकर सुगरे यांचे मौलिक सहकार्य मिळत आहे. पदवी परीक्षेच्या प्रारंभ दिनी परीक्षार्थी आणि पालकांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार आणि गुलाब पुष्प देऊन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सन्मान करून परीक्षेसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहे.

# शिरीन संजू लोखंडे यांची पहिल्या महिला कामगार सह आयुक्त पदावर पदोन्नती.

मुंबई :- फुले शाहू आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या आयुष्यमती.शिरीन संजू लोखंडे यांची राज्यातील पहिल्या महिला कामगार खात्यातील सह आयुक्त पदावर पदोन्नती झालेल्या आहेत. राज्यातील अनेक संघटीत असंघटित कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात आणि कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना योग मार्गदर्शन करत असतात. कामगार विभागात गेल्या तीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या शिरीन संजू लोखंडे यांची सरकारने कामगार सहआयुक्तपदी नियुक्ती केली. सहआयुक्तपदी शिरीन लोखंडे या पदोन्नती मिळालेल्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. कामगार आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण,बालकामगारांची सुटका,कामगार कायद्यांबाबत जागरुकतेच्या कार्यशाळा,महिला कामगार कर्मचारी मेळावे,परिषदा अशा अनेक उपक्रमांमध्ये लोखंडे यांचा सक्रिय सहभाग घेत असतात. राज्यभरातील फुले शाहू आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे हार्दिक




अभिनंदन केले आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे कामगार वर्गात आनंद साजरा करण्यात येत आहे. त्याच्या कार्यालयातील कर्मचारी अधिकारी नेहमीच कुटुंबासारखे त्यांच्या सोबत उभे राहतात.दरवर्षी महापरिनिर्वाण दिनी हे दिसून येते. त्याच प्रमाणे क्रांतिकारी विचारांची भिम जयंती उत्सव त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात दरवर्षी साजरी होत असते.अशा क्रांतिकारी विचारांच्या अधिकारी शिरीन संजू लोखंडे राज्यातील पहिल्या महिला कामगार सह आयुक्त पदावर पदोन्नती झाल्या बदल सागर तायडे अध्यक्ष स्वतंत्र मजदुर युनियन महाराष्ट्र राज्य यांनी विशेष हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचलीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ.घुगे यांचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र व हॉस्पिटलचा परवाना रद्द करावा ;मातंग समाजाची मागणी

लातूर: लातूर येथील आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रमोद घुगे यांनी हॉस्पिटलच्या लिफ्टच्या कामाच्या संबंधाने मातंग समाजातील कामगार आनंद प्रल्हाद कोटंबे यांना अमानुषपणे मारहाण करून जीवे मारण्याची जमकी दिली.डॉ.प्रमोद घुगे यांनी पैशाच्या जोरावर लातूर शहरात दहशत निर्माण केले असून दलित समाजाच्या कामगाराला जातीय द्वेषातून माणुसकीला काळीमा फासणारे गुन्हेगारी कृती केले आहे. त्यांच्या आयकॉन हॉस्पिटलमध्ये लिफ्ट बसविण्याचे कंत्राट आनंद कोटुंबे यांना दिले होते त्या संबंधित कायदेशीर करारही केले होते. हे काम महागात पडत आहे या गैरसमजुने त्यांनी लिफ्ट बसविण्याचे चालू असलेले काम बंद केले आणि





कामगार आनंद कोटंबे यांच्याकडे ५० लाख रुपयाची मागणी केली अन कुटुंबे यांना ते शक्य नसल्याने डॉ.प्रमोद घुगे यांनी आनंद कोटंबे यांचे अपहरण करून त्यांच्या फार्म हाऊस मधील म्हशीच्या गोठ्यात दोन दिवस दाबून ठेवले व भाडोत्री गुंडाकडून त्यांना सतत दोन दिवस अमानुष मारहाण केले.एवढेच नव्हे तर त्यांच्या गुप्तांगांमध्ये मिरचीची पूड टाकून त्यांच्यावर अनैसर्गिक अत्याचारही केला व मरणासन्न अवस्थेत रेल्वे स्टेशन रोडला टाकून दिले. कोटुंबे शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. लातूर जिल्ह्यातील पोलिस, जिल्हा प्रशासन आरोपी डॉ. घुगे यांचे सगेसोयरे असल्याने त्यांना पोलीस दाद देत नव्हते. अखेर सामाजिक संघटनेने प्रशासनावर दबाव वाढविल्याने त्यात कारवाई झाली पण अजूनही तीन-चार दिवस झाले तरीही डॉ.घुगे यांना पोलिसांकडून अटक होत नाही. एवढा अमानुष अत्याचार झाल्यानंतरही त्यांच्यावर ३०७ सारखा गुन्हा नोंद होत नाही, यासाठी समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांना २ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात आरोपी डॉ. प्रमोद घुगे यांचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र व त्यांच्या हॉस्पिटलचा परवाना रद्द करावा अशा आशयाचे निवेदन दिले आहे. याची प्रत माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री,माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय पालकमंत्री,माननीय स्थानिक आमदार अमित देशमुख, माननीय पोलीस अधिक्षक,माननीय आयुक्त मनपा यांच्याकडेही देण्यात आल्याची यात नमूद केले आहे. या निवेदनावर सर्वश्री अशोक देडे, संतोष मस्के, दशरथ मस्के, गोरोबा लोखंडे, नारायण कांबळे,शिरीष दिवेकर, सुभाष सूर्यवंशी, अंगद वाघमारे , गायकवाड बी .पी.,मोहन शिंदे, सूर्यवंशी बी. पी.,आनंद वैरागे, के.के.मुखेडकर ,भानुदास कुडके, रामलिंग भडंगे,मारुती माने, दिनकर मस्के,संतोष पटनुरे, प्रवीण जोहारे, नागनाथ कलवले,तुकाराम केदासे, डॉ. शिवाजी जवळगेकर, मोहन सुरवसे, पी.के .सावंत आदीसह समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नरेन बाद, रघुवंशी दमदार अर्धशतक

दिल्लीविरूद्धच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्णधार श्रेयसने प्लेइंग-११ मध्ये एक बदल केला आहे. आंगकृष्ण रघुवंशीला प्लेइंग-११ मध्ये स्थान मिळाले आहे. त्याचवेळी दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंत म्हणाला की त्यानेही नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला असता. पंतने प्लेइंग-११ मध्येही बदल केला आहे. मुकेश कुमार जखमी झाला आहे. त्याच्या जागीअष्टपैलू सुमित कुमारला संघात स्थान मिळाले आहे.नरेन बाद, रघुवंशी दमदार अर्धशतक कोलकाताला १३व्या षटकात १६४ धावांवर दुसरा धक्का बसला. मिचेल मार्शने सुनील नरेनला यष्टिरक्षक पंतकडे झेलबाद केले. तो ३९ चेंडूंत सात चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ८५ धावा करून बाद झाला. त्याचवेळी, अंगकृश रघुवंशीने आयपीएल पदार्पणातच अर्धशतक झळकावले. त्याने आपले अर्धशतक २५ चेंडूत पूर्ण केले.नरेन-रघुवंशी जोडीची तुफानी फलंदाजी नऊ षटकांनंतर कोलकाताने एक विकेट गमावून १२६ धावा केल्या आहेत. सध्या सुनील नारायणने २८ चेंडूत ६८ धावा केल्या आहेत. तर अंगकृश रघुवंशीने १४ चेंडूत ३१ धावा केल्या आहेत. या दोघांनी चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडत तुफानी फलंदाजी करत आहेत. आतापर्यंत दोघांमध्ये दुसऱ्या विकेटसाठी २७ चेंडूत ६६ धावांची भागीदारी झाली आहे. सुनील नरेनने २१ चेंडूत अर्धशतक झळकावले. त्याचे आयपीएल कारकिर्दीतील हे सहावे अर्धशतक आहे.

# कांदिवलीतील दामुनगर मुख्य रस्त्यावर पाणी गळतीमुळे रस्त्यावर तळे

ही फार जुनी लाईन आहे.तेथे बेकायदेशीर कनेक्शन खूप आहे.ते तपासावे लागेल. तसेच कनेक्टर लिकेज असल्याने, पोरर्शन चेंज करून पाणी गळती थांबविण्यात येईल व त्यावर काँक्रीट करण्यात येईल.जेणेकरून पुन्हा लिकेज होणार नाही.

– महेश चौगुले. कनिष्ठ अभियंता जलविभाग आर/दक्षिण

मुंबई / शहामत शेख :- दामू नगर भागात सहा इंच पाणी पुरवठा लाईनला गळती असल्याचे चित्र आहे .यामुळे रस्ता वाहते झरणे झाले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने या मुख्य रस्त्यावर नेहमीच पाणी गळती लागत असलेल्या लाईनची तात्काळ दुरुस्ती करत गळती रोखावी अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. या लिकेज मुळे रस्त्यावर जागोजागी खड्ड्यात पाणी साचल्यामुळे



वाहनचालकांना मार्ग काढणे कठीण जात आहे. तसेच दुचाकी वाहने घसरून अपघात होतात.याच रस्त्यावर रिक्षा स्टँड, शौचालय,शाळा, व मार्केट असल्याने लोकांची नेहमी वर्दळ असते. यामुळे ज्येष्ठ नागरिक,शाळकरी मुले ,स्त्रिया यांना रस्ता ओलांडणे धोक्याचे झाले आहे. तसेच पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत आहे. गेल्या महिन्याभरापासून पाणी लिकेज असल्याने महानगरपालिका आर दक्षिण जल याकडे दुर्लक्ष करत आहे. महापालिकेकडून वारंवार पाणी बचत करण्याचे आव्हान करत असताना पाणी गळती तात्काळ रोखावी अशी मागणी होत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सवाला मध्यरात्री पर्यंत वेळ ; जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांचे रवि गायकवाड, जितेंद्र बनसोडे यांच्यातर्फे आभार!

लातूर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती उत्सवानिमित्ताने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी शहरातील मिरवणुका संगीत डीजे उत्सव सांस्कृतिक वाद्यवृंद घोषणाबाजी आतिषबाजीला दिनांक १४ एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंतचा वेळ दिला असल्याने सार्वजनिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष रवी गायकवाड यांनी





जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांचे आभार मानले आहेत. गेल्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला दहा वाजताच पोलिसाने बंद केल्यामुळे गांधी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायानी धन्य आंदोलन करून बारा वाजेपर्यंत वेळ द्या अशी मागणी केली होती. परंतु पोलिसांनी दहा वाजताच बंद केल्यामुळे पोलीस प्रशासनाबद्दल नाराज झाले होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष रवी गायकवाड यांनी १६ मार्च रोजी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना बारा वाजेपर्यंत वेळ द्यावा असे लेखी निवेदन दिले होते. सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष जितेंद्र बनसोडे यांनी २२ मार्च रोजी १२ वाजेपर्यंत वेळ द्यावा असे लेखी निवेदन दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमाची भव्य मिरवणूक काढले जाते लातूर शहरातील विविध प्रभाग वसाहती मधूनही ढोल ताशा,डीजे, वाद्य वृंदाच्या,संगतीने अबाल वृद्धाची भव्य दिव्य देखावे मिरवणुकीत असते. कार्यकर्ते आणि पोलिसांच्या संरक्षणाखाली या मिरवणुका निघत असतात त्यावर जिल्हा प्रशासनाचे लक्ष असते त्यानुसार कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे हे सतर्क असून सार्वजनिक जयंती उत्सवासह शहरातील उपनगरातील उत्सव मंडळास आणि डॉ. आंबेडकर पार्कवरील उत्सवात सर्वकष सोहळा साजरा करण्यासाठी रवि गायकवाड, जितेंद्र बनसोडे यांच्या निवेदनाचा विचार करून १४ एप्रिल रोजी रात्री १० ऐवजी १२वाजेपर्यंत चा वेळ दिला असल्याने आंबेडकरी जनतेने तसेच सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रवी गायकवाड यांनी जिल्हा प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE